आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१४ ऑक्टोबर २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- राज्यातल्या आणखी ३९ तालुक्यात दुष्काळ जाहीर, शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ५ हजार रुपयांची आर्थिक मदत मिळणार

- ४० टक्के दिव्यांगत्व आणि जन्मापासून दिव्यांगत्व असणाऱ्यांना सुध्दा आर्थिक मदत द्यायचा केंद्र सरकारचा निर्णय

- ११ लाखांहून अधिक रेल्वे कर्मचाऱ्यांना सुमारे १८ हजार रुपये बोनस मिळणार

**आणि**

- ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा सुचवण्यासाठी केंद्र सरकारकडून समितीची स्थापना

<><><><><>

राज्यात आणखी ३९ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळं राज्यातल्या ८५ टक्के भागात आणि ३५८ पैकी ३०४ तालुक्यात १२ दुष्काळी सवलती आणि उपाययोजना लागू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मुंबईत दिली. अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून...

**- - होल्ड.. कॅप्सूल - -**

(नव्यानं दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये दुष्काळी उपाययोजना आणि विविध सवलती लागू केल्या जाणार आहेत. तसंच पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. याशिवाय दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या राज्यातल्या शेतकर्‍यांच्या बँक खात्यात अग्रीम मदत म्हणून दिवाळीपूर्वी पाच हजार रूपये जमा केले जाणार असून या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड... बाईट- मुख्यमंत्री**

शेतकऱ्यांकडून कर्ज वसुलीसाठी कुठल्याही प्रकारचा तगादा लावण्यात येऊ नये, अशी सक्ती ताकीद संबंधित सोसायट्यांपासून, जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका आणि मायक्रोफायनान्स

कंपन्यांना दिल्याचंही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं. पिण्याच्या पाण्यासाठी गरजेनुसार टँकरचा पुरवठा करण्यात येत असून त्याच्यावर जीपीएस ट्रॅकर लावण्यात आला आहे. तसंच, चाऱ्याच्या पुरवठ्याचा आढावा घेण्यात येत असल्याचं सांगत मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना रब्बी हंगामात ज्वारीसारखी चारा देणारी पिकं घेण्याचं आवाहन केलं. रब्बी पिकं घेणाऱ्या शेतकऱ्यांनी चारापिकं घेतल्यास सगळा चारा शासन हमीभावाने विकत घेईल, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं दिव्यांग असणाऱ्या व्यक्तींना जन्मापासून आर्थिक मदत द्यायचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी १८ वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्यांना ही मदत दिली जात होती.

**होल्ड - कॅप्सूल**

*(राष्ट्रीय सामाजिक मदत कार्यक्रमाच्या अंतर्गत मिळणारी मदत आणखी ५ वर्ष द्यायला केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. त्यासाठी ५३ हजार ४२८ कोटी रुपयांच्या निधी खर्च होईल आणि ३ कोटी २० लाख लाभार्थ्यांना याचा फायदा मिळेल.*

*पूर्वी इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग पेन्शन योजना या नावानं ओळखली जाणारी योजना आता प्रधानमंत्री दिव्यांगजन पेंन्शन योजना या नावानं ओळखली जाईल. याविषयी माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी अधिक माहिती दिली.*

*- -- होल्ड - अश्विनी वैष्णव बाइट - - -*

*या अंतर्गत ७९ वर्षं वयापर्यंत दरमहा ३७५ रुपये आणि त्यापुढे दरमहा सव्वा सहाशे रुपये आर्थिक मदत मिळेल. पूर्वी केवळ १८ वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्यांना दरमहा ३०० रुपये या दरानं ही मदत मिळत होती.*

*इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धावस्था पेन्शन आता प्रधानमंत्री वृद्धावस्था पेंशन योजना म्हणून तर इंदिरा गांधी विधवा पेन्शन योजना आता प्रधानमंत्री विधवा पेंशन योजना म्हणून ओळखली जाईल. राष्ट्रीय परिवार लाभ योजनेचं नाव आता प्रधानमंत्री परिवार लाभ योजना असं केलं आहे.*

*रेल्वेतल्या ११ लाख ४० हजाराहून अधिक अराजपत्रित कर्मचाऱ्यांना बोनस देण्याचा निर्णयही आज मंत्रीमंडळानं घेतला. या कर्मचाऱ्यांना कमाल १७ हजार ९५१ रुपये बोनस म्हणून मिळतील.*

*याशिवाय IDBI बँकेतला ६० टक्क्यांहून अधिक सरकारी हिस्सा विक्रीलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. कॅनडाच्या Fairfax Financial Holdings ला ५२ हजार ८७८ कोटी रुपयांना हा हिस्सा विकला जाईल. या आर्थिक वर्षाच्या अखेरीपर्यंत हा व्यवहार पूर्ण केला जाईल. यानंतर केंद्र सरकार आणि एलआयसीचा एकूण हिस्सा ३४ टक्के असेल, अशी माहिती वैष्णव यांनी दिली. एअर इंडियाच्या विक्रीनंतरची ही सर्वात मोठी निर्गुंतवणूक आहे. तसंच देशात येणारी सर्वात मोठी थेट परकीय गुंतवणूक असेल.)*

<><><><><>

महाराष्ट्र आणि कर्नाटकातल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची पडताळणी करण्यासाठी, आणि त्यांच्या समस्यांवर उपाययोजना सुचवण्यासाठी, केंद्र सरकारनं आज नीती आयोगाचे माजी सदस्य रमेश चंद यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली.

उत्पादन खर्च वाढत असल्यानं उसाचे आधारभूत दर वाढवून द्यावेत, साखरेचा किमान विक्री दर प्रति किलो ३१ रुपयांवरून ५० रुपयांपर्यंत वाढवावा, या शेतकऱ्यांच्या मागण्या आहेत. या मागण्या, तसंच साखर उतारा तपासण्याची आणि त्याचा अहवाल देण्याची कार्यपद्धत, कारखान्यांमधली ऊसाचं वजन करण्याची पद्धत, यंत्राद्वारे तोडणी केलेल्या उसाच्या वजनातून केल्या जाणाऱ्या कपातीशी संबंधित पद्धत, यांची तपासणी आणि मूल्यांकन ही समिती करेल.

<><><><><>

बहुराज्यीय पतसंस्थांसाठीच्या लेखापरीक्षणाचे नवे निकष केंद्र सरकारनं आज जाहीर केले. पहिल्या टप्प्यात १ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक मालमत्ता असणाऱ्या पतसंस्थांना हे निकष लागू होतील. इतरांना त्यांची यंत्रणा सुधारण्यासाठी वेळ दिला जाईल, असं केंद्रीय सहकार मंत्रालयानं म्हटलं आहे. ५० कोटी रुपयांहून अधिक मालमत्ता असणाऱ्यांना या कक्षेत आणण्याचं सहकार मंत्रालयाचं उद्दिष्ट आहे.

<><><><><>

वाहनांमधून होणारं वायुप्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीनं विविध प्रकारच्या नवीन वाहनांना एप्रिल २०२९ पासून बी एस - सात उत्सर्जन मानकं लागू करण्याचा केंद्र सरकार विचार करत आहे. युरोपियन मानकांशी सुसंगत असणाऱ्या या मानकांबद्दलची मसुदा

अधिसूचना येत्या आठवडाभरात जाहीर होण्याची अपेक्षा आहे, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

नवी दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीने आयोजित केलेल्या आंदोलनांदरम्यान मेट्रो रेल्वेच्या कोणत्याही फेऱ्या रद्द करण्यात आल्या नव्हत्या तर ३०३ स्थानकांपैकी ४५ स्थानकांवर प्रवेश आणि बाहेर पडण्यावर प्रतिबंध घालण्यात आले होते असं दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळाने आज सर्वोच्च न्यायालयाला सांगितलं. कायदा आणि सुव्यवस्था राखणाऱ्या संस्थांनी दिलेल्या सूचनांना अनुसरून हे प्रतिबंध घालण्यात आले होते आणि तरीही सुमारे ८५ टक्के मेट्रो फेऱ्या सुरळीत सुरु होत्या असं महामंडळाने आपल्या प्रतिज्ञापत्रात म्हटलं आहे. नवी दिल्लीतल्या निदर्शनांदरम्यान मेट्रो आणि रेल्वेसेवा बंद करण्यात आल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठासमोर सध्या सुनावणी सुरु आहे.

<><><><><>

राज्यातल्या सर्व माध्यमांच्या शाळांमधल्या विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड बंधनकारक करायचा निर्णय राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी आज जाहीर केला. राज्यातल्या सर्व माध्यमांच्या १ लाख ८ हजार शाळांमधल्या सुमारे २ कोटी १० लाख विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण दिलं जाईल. सध्या ३० हजार शाळांमधल्या सुमारे १७ लाख ३३ हजार विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण दिलं जातंय. राज्य पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना सध्या तीन, तर राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना दहा गुण दिले जातात. या गुणांमध्ये वाढ करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश भुसे यांनी दिले.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर आणि कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री अनिता आनंद यांनी आज उभय देशांमधला व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, ऊर्जा, संरक्षण आणि व्यक्ती - व्यक्तींमधली देवाणघेवाण यातल्या प्रगतीचा आढावा घेतला. नवी दिल्लीत आज झालेल्या बैठकीत विविध प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचारविमर्श झाल्याची माहिती जयशंकर यांनी समाज माध्यमांवरच्या पोस्टमध्ये दिली आहे. उभय देश शासन आणि उद्योग यांच्यातल्या धोरणात्मक भागीदारीला पुढे नेत आहेत, असंही त्यांनी नमूद केलं आहे.

बदलत्या जागतिक परिस्थितीत भारत आणि कॅनडा यांच्यातल्या घनिष्ट सहकार्यामुळे मुक्त, खुल्या आणि संपन्न हिंद प्रशांत क्षेत्राची घडण  होईल,असा विश्वास अनिता आनंद यांनी व्यक्त केला.

<><><><><>

चीनबरोबरचे संबंध पुन्हा मजबूत करण्याचा भारताचा प्रयत्न असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरम कार्यक्रमात आज ते बोलत होते. २०२०मधे गलवान खोऱ्यातल्या संघर्षानंतर हे संबंध ताणले गेले, मात्र ते पूर्ववत करण्याच्या दृष्टीनं  दोन्ही बाजूंनी अनेक पावलं उचलली गेली असं ते म्हणाले. आधुनिक जगात इतर देशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखण्याचं महत्त्व सर्वच देशांनी ओळखलं आहे, असं सांगून ते म्हणाले, की अडचणीच्या काळात इतरांकडून मदत मिळाली नाही तेव्हा भारताने आत्मनिर्भरतेचं उद्दिष्ट ठरवलं.

<><><><><>

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज हैदराबाद इथं राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानावर सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा वेस्ट इंडीजच्या १३ षटकात ३ बाद १५६ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//